# 'मुकुल माधव'तर्फे महिलांसाठी कर्करोग निदान शिबीर

प्रतिनिधी

रत्नागिरी

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून फिनोलेक्स पाईप्स यांच्या सामाजिक बांधिलकीमध्ये सहभागी असणारी मुकुल माधव फाऊंडेशन आणि परकार हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर-रत्नागिरी यांच्यातर्फे स्त्रियांना स्तनाचे कर्करोग निदान शिबीर ८ मार्च ते १५ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराची सुरूवात परकार हॉस्पिटलमध्ये ८ मार्च रोजी महिला दिनी सकाळी करण्यात आली.



**रत्नागिरी : परकार हॉस्पिटलमध्ये तपासणीला प्रारंभ झाला.**

मागील वर्षी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स यांच्या सहकार्याने परकार हॉस्पिटलला महिलांसाठी कर्करोगाची चिकित्सा करण्यासाठी मॅमोग्राफी आणि कोलोस्कॉपी यंत्र देणगी स्वरूपात देण्यात आले आहे. यावर्षीच्या शिबीराला पहिल्या दिवशीच महिलांनी बहुसंख्येने तपासणी करून घेतली.

### 'फिनोलेक्स पाईप्स' शिबिराचे प्रायोजक

महिला दिनानिमित्त हे शिबीर सवलतीच्या दरात करण्यात येणार आहे. फिनोलेक्स पाईप्सतर्फे प्रथम येणाऱ्या २०० गरीब व गरजू महिलांच्या चिकित्सेसाठी प्रायोजकत्व स्वेच्छेने स्वीकारले आहे.

रत्नागिरीच्या महिलांना मुंबई किंवा कोल्हापूर येथे अशा चाचणीसाठी जावे लागत होते. त्यामुळे खर्च आणि वेळेचा अपव्यय लक्षात घेता रत्नागिरीतील अनेक महिला अशा चाचण्या करून घेण्यास टाळाटाळ करत होत्या. त्याचा दुष्परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होत होता. या शिबीरात ३५ वर्षीय महिलांची चाचणी करण्यात येणार आहे. प्रशांती कॅन्स केअर मिशन-पुणेचे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. सी. बी. कोप्पीकर हे परकार हॉस्पिटलमध्ये नियमित उपस्थित रहाणार आहेत. तसेच चिकित्सांचे अहवाल व मूल्यांकन हे प्रशांती कॅन्सर केअर टिम यांच्यामार्फत ऑनलाईन होणार आहे.